# मेट्रो ३ च्या चाचणीचा मार्ग ऑगस्टमध्ये मोकळा !

लोकसत्ता प्रतिनिधी

**मुंबई :** कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो ३ प्रकल्पातील पहिली मेट्रो गाडी आंध्र प्रदेशातून ऑगस्टमध्ये मुंबईत दाखल होण्याची शक्यता आहे. गाडी मुंबईत येण्यास मोठा विलंब झाल्याने मेट्रो ३ ची चाचणी रखडली आहे. आता ऑगस्टमध्ये गाडी येणार असल्याने चाचणीचा मार्ग मोकळा होणार आहे.

मेट्रो ३ चा कारशेड कांजूरमार्ग येथून पुन्हा आरेत करण्याचा निर्णय घेऊन प्रकल्प पुढे नेण्याचा प्रयत्न राज्य सरकारकडून होत आहे. हे उद्दिष्ट गाठण्यासाठी मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या (एमएमआरसी) व्यवस्थापकीय संचालक पदाची धुरा पुन्हा अश्विनी भिडे यांच्या हाती देण्यात आली आहे. पदभार स्वीकारल्यानंतर भिडे यांनी शनिवारी प्रकल्पाला भेट देऊन कामाचा आढावा घेतला. पॅकेज ७ मधील मेट्रो स्थानकाच्या आणि मरोळ येथील तात्पुरत्या कारशेडची पाहणी केली.

मेट्रो ३ प्रकल्पासाठी आंध्र प्रदेशातील श्रीसिटी येथे ३१ मेट्रो गाड्यांची बांधणी करण्यात येत आहे. यातील पहिली गाडी तयार होऊन कित्येक महिने झाले, मात्र गाडी मुंबईत दाखल झालेली नाही. कारशेड अधांतरी असल्याने मरोळ-मरोशी येथे तात्पुरते कारशेड बांधण्यात येत आहे. या कारशेडचे काम अपूर्ण असल्याने गाडी आणणे शक्य झाले नाही. आता हे काम पूर्णत्वास आले आहे. या कामाची पाहणी भिडे यांनी केली. याअनुषंगाने ऑगस्टमध्ये पहिली मेट्रो मुंबईत दाखल होईल, अशी माहिती या वेळी त्यांनी दिली.

## तात्पुरत्या कारशेडची प्रतीक्षा

मेट्रो ३ ची चाचणी डिसेंबर २०२१ पासून रखडली आहे. तात्पुरते कारशेड पूर्ण न झाल्याने परिणामी गाडी मुंबईत दाखल होऊ शकली नाही. त्यामुळे चाचणी रखडली आहे. ऑगस्टमध्ये गाडी येणार असल्याने चाचणीही मार्गी लागणार आहे. चाचणी नेमकी कधी होईल याविषयी भिडे यांना विचारले असता त्यांनी याबाबत लवकरच माहिती देऊ, असे सांगितले.

